वाचले-

१ मा.सहशहर अभियंता पर्यावरण व जलनिसा:रण विभाग यांचेकडील पत्र क्रमांक पापु/जनि/४/कावि/२८३/२०२४ दिनांक २७/०३/२०२४

२ महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्ती वेतन) नियम १९८२ मधील नियम १०(१)

३ परिपत्रक क्र.दवनि/१/कावि/९७/२०२२ दिनांक १४/०३/२०२२

४ मा.आयुक्त यांचेकडील दिनांक०८/०६/२०२४ रोजीचा मान्य प्रस्ताव

---

पिंपरी चिंचवड महानगरपालिका,<br>
पिंपरी ४११०१८,<br>
सामान्य प्रशासन विभाग<br>
क्रमांक साप्रवि/३अ/कावि/३७/२०२४<br>
दिनांक १०/०६/२०२४

**विषय :- श्री.देसले विलास नामदेव, कार्यकारी अभियंता (स्थापत्य) यांचे नियत वयोमानानुसार सेवानिवृत्तीबाबत... (सं.क्र.३२१९)**

आदेश,

श्री.देसले विलास नामदेव हे पिंपरी चिंचवड महानगरपालिका आस्थापनेवर "कनिष्ठ अभियंता" या पदावर दिनांक २५/०८/१९९८ रोजी रुजू झाले असून सद्यस्थितीमध्ये कार्यकारी अभियंता (स्थापत्य) या गट 'अ' मधील पदावर कार्यरत आहेत. श्री.देसले विलास नामदेव, कार्यकारी अभियंता (स्थापत्य) यांची जन्मतारीख ०२/०७/१९६६ अशी असून दिनांक ०१/०७/२०२४ रोजी त्यांच्या वयास ५८ वर्षे पूर्ण होत आहे.

महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्ती वेतन) नियम १९८२ मधील नियम १०(१) मधील तरतूदीनुसार श्री.देसले विलास नामदेव, कार्यकारी अभियंता (स्थापत्य) यांना दिनांक ३१/०७/२०२४ रोजी मध्यान्होत्तर महानगरपालिका सेवेमधून नियत वयोमानानुसार सेवानिवृत्त करणे आवश्यक आहे.

श्री.देसले विलास नामदेव, कार्यकारी अभियंता (स्थापत्य) हे महानगरपालिका सेवेत रूजू झाल्याचे तारखेपासून नियत वयोमानानुसार सेवानिवृत्तीचे तारखेपर्यंत म्हणजे दिनांक ३१/०७/२०२४ पर्यंत त्यांची एकूण २८ वर्ष २ महिने ४ दिवस इतकी सेवा पूर्ण होत आहे.

श्री.देसले विलास नामदेव, कार्यकारी अभियंता (स्थापत्य) यांचेकडून महानगरपालिकेस घरबांधणी अग्रिम, घर दुरुस्ती अग्रिम, संगणक अग्रिम, वाहन अग्रिम, कामगार कल्याण निधी अग्रिम, वैद्यकीय अग्रिम किंवा इतर कोणत्याही प्रकारचे येणे बाकी नसून सद्यस्थितीत त्यांचेविरुध्द कोणत्याही प्रकारची खातेनिहाय चौकशी चालू अथवा प्रस्तावित नसलेने उपरोक्त वाचले क्र.१ चे पत्रान्वये विभागप्रमुखांनी श्री.देसले विलास नामदेव, कार्यकारी अभियंता (स्थापत्य) यांना नियत वयोमानाने सेवानिवृत्त करणेबाबत स्पष्टपणे शिफारस केली आहे.

सबब, मी उप आयुक्त, सामान्य प्रशासन विभाग, पिंपरी चिंचवड महानगरपालिका उपरोक्त वाचले क्र.४ चे मा.आयुक्त यांचेकडील मान्य प्रस्तावानुसार व उपरोक्त वाचले क्र.३ चे परिपत्रकान्वये आदेश निर्गमित करणेबाबत निश्चित केलेले धोरणानुसार तसेच महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्ती वेतन) नियम १९८२ मधील तरतूद विचारात घेता श्री.देसले विलास नामदेव, कार्यकारी अभियंता (स्थापत्य) यांना दिनांक ३१/०७/२०२४ रोजी मध्यान्होत्तर महानगरपालिका सेवेमधून नियत वयोमानानुसार सेवानिवृत्त करण्यास प्रस्तुत आदेशान्वये मान्यता देत आहे.

प्रस्तुत आदेशाची नोंद श्री.देसले विलास नामदेव, कार्यकारी अभियंता (स्थापत्य) यांचे सेवानोंद पुस्तकात घेणेत यावी.

(विठ्ठल जोशी)<br>
उप आयुक्त,<br>
सामान्य प्रशासन विभाग<br>
पिंपरी चिंचवड महानगरपालिका<br>
पिंपरी ४११०१८

प्रति - श्री.देसले विलास नामदेव, कार्यकारी अभियंता (स्थापत्य)

प्रत - लेखा विभाग

२/- श्री.देसले विलास नामदेव, कार्यकारी अभियंता (स्थापत्य) यांचेकडून महानगरपालिकेस येणे असलेली रक्कम त्यांना देय असणा-या रकमेतून वजा करुन उर्वरित रकमा त्यांना त्वरीत अदा करण्याची कार्यवाही करणेत यावी.

१.लेखापरिक्षण विभाग २.दूरसंचार विभाग ३.माहिती व जनसंपर्क विभाग<br>
४.कामगार कल्याण विभाग ५.माहिती व तंत्रज्ञान विभाग<br>
६.सामान्य प्रशासन टेबल क्र. ७, ९, १०, १२, १४, १६, २२, संगणक कक्ष ७.पिं.चिं.मनपा कर्मचारी महासंघ<br>
८.पिं.चिं.मनपा कर्मचारी पतसंस्था ९.सर्व संबंधित विभाग